Rotary
Club of Latur Mid-town

UNITE FOR GOOD

साप्ताहिक

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MID-TOWN

ROTARY INTERNATIONAL DISTRICT 3132 | Club No.: 22604

ऑगस्ट - २०२५ | चौथा अंक

## कृषी विशेषांक





**Rtn.Francesco Arezzo**
RI President 2025-26



**Rtn.Sudhir Lature**
Dist.Governor 2025-26



**Rtn.Amol Dadge**
President



**Rtn.Pavan Malpani**
Secretary

## Guest Editor Rtn.Chandrakant Baraskar



प्रिय रोटेरियन बांधवांनो,

कृषी हा आपल्या देशाचा आत्मा आहे. शेतकरी हा आपल्या समाजाचा कणा आहे. पाऊस, माती व निसर्गाशी थेट संवाद साधत तो अन्नदाता म्हणून कार्य करत असतो. आजच्या युगात तंत्रज्ञान, संशोधन व नवकल्पनांच्या मदतीने कृषी क्षेत्राला नवीन दिशा मिळत आहे. तरीसुद्धा, शेतकऱ्यांच्या समस्या, उत्पादनातील अनिश्चितता व बाजारपेठेतील चढ-उतार या आव्हानांमुळे शाश्वत शेतीची गरज अधिक तीव्रतेने जाणवते.रोटरी ही समाजोपयोगी कार्य करणारी जागतिक संस्था आहे. सेवा सर्वोपरि हा आपला मूलमंत्र आहे. या सेवाभावातूनच कृषी विशेषांक साकारत आहे. यातून शेतकऱ्यांच्या समस्या, त्यांच्या यशोगाथा, नवे प्रयोग, तसेच मार्गदर्शनपर माहिती सर्वांसमोर येईल.माझा विश्वास आहे की या विशेषांकातून आपल्या शेतकरी बांधवांना नवीन प्रेरणा मिळेल आणि समाजात कृषीविषयी अधिक सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होईल.अतिथी संपादक म्हणून मला ही संधी दिल्याबद्दल मी रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन व संपादक मंडळाचे मनःपूर्वक आभार मानतो.

आपला,
रो. चंद्रकांत बारस्कर, अतिथी संपादक रोटरी दिशा-कृषि विशेषांक

## Secretary Report

- राष्ट्रगीताने बैठकीची सुरुवात
- फोरवे टेस्टचे वाचन सामुदायिक पद्धतीने झाले.
- अध्यक्षांनी सर्वांचे शब्दसुमनांनी स्वागत केले
- मागील मिटींग क्र. ७ चा अहवाल रो. डॉ. अविनाश भोसले यांनी सादर केला.
- साप्ताहिक पत्रव्यवहाराची माहिती अध्यक्षांनी दिली
- चित्रकला स्पर्धा बाबत माहिती अध्यक्षांनी सभागृहास दिली, १४ सप्टेंबर, रविवार, श्रीकिशन सोमाणी शाळेत घेण्याचे ठरले असल्याचे सांगितले, रो. योगेश काळे १२ सायकल स्पॉन्सर करत असल्याचे सांगितले. सर्व सदस्यांनी या स्पर्धेमध्ये प्रोजेक्ट चेअरमन सोबत काम करून प्रोजेक्ट यशस्वी करण्याचे आवाहन केले.
- क्लब बुलेटिन- रो. अमोल बनाळे- साप्ताहिक बुलेटिनचे विमोचन केले.
- मेम्बरशीप सेमीनार - प्रोजेक्ट चेअरमन अजय बारोळे यांनी १७ ऑगस्ट रोजी अकलूजमध्ये होणाऱ्या या सेमिनार मध्ये ११ सदस्य सहभागी होणार असल्याचे सांगितले.
- गणपतीची कार्यशाळाः रो. अविनाश आळंदकर यांनी १९ ऑगस्ट दुपारी ३ वा. काटगाव येथील वसंतराव नाईक शाळेत गणपतीची कार्यशाळा होणार असल्याचे सांगितले. या कार्यशाळेला डॉ. गिरीष कुलकर्णी मार्गदर्शन करणार असल्याचे सांगितले. सर्व सदस्यांनी कार्यशाळेस हजर रहावे असे सांगितले.
- ग्लोबल ग्रँट अंतर्गत डायलिसिस युनिट करीता पीपी रविंद्र बनकर सोबत प्रयत्न चालू असल्याचे अध्यक्षांनी सांगितले
- सीएसआर फंडातून डिजिटल क्लासरुमसाठी प्रयत्न करणार असल्याचे अध्यक्षांनी सांगितले यासाठी त्या शाळेचा इंटरॅक्ट क्लब स्थापन करणे बंधनकारक आहे असे सुचवले .
- नेशन बिल्डर अॅवार्ड लवकरच घेण्यात येईल असल्याचे अध्यक्षांनी सांगितले
- मागील काही वर्षात रोटरी सोडलेल्या सदस्यांची यादी रो. कलश मुंदडा यांनी वाचुन दाखवली व रीकनेक्ट करण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन केले
- डिस्ट्रीक्ट अवॉर्डस - क्लब ट्रॉफीज बद्दलची माहिती अध्यक्षांनी सभागृहास दिली.
- पोद्दार हॉस्पिटल व रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने अस्थिरोग तपासणी शिबिर १४ ऑगस्ट रोजी घेण्यात आले २५६ रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.
- फेलोशिप अनाऊन्समेंटः रो. प्रशांत भाटगावे यांनी केली.

### Man of The Meeting



Rtn.Shrikant Panchakshari

### 1st Come in the Hall



Rtn.Govind Kunchamwar

## रोटरी शेती औजारे बँक रोटरी क्लब ऑफ लातूर मिड-टाऊनचा **पहिल्या ग्लोबल ग्रँट ची यशोगाथा**



वर्ष २०२३-२४ हे रोटरी क्लब ऑफ लातूर मिड-टाऊनसाठी एक ऐतिहासिक टप्पा ठरला. स्थापनेनंतर तब्बल ४० वर्षांनी क्लबने आपला पहिला ग्लोबल ग्रँट साकारला आणि तोही शेतकरी बांधवांच्या जीवनाशी थेट जोडलेला. Rotary Foundation च्या सहाय्याने व अमेरिकेतील Rotary Club of Emmaus या भागीदार क्लबच्या सहकार्याने हा प्रकल्प प्रत्यक्षात उतरला.धाराशिव जिल्ह्यातील हराळी हे गाव हलक्या जमिनींच्या पट्ट्यात येते. दुष्काळ, अल्पभूधारक शेतकरी, आधुनिक शेती साधनांची कमतरता, कमी उत्पादन परिणामी तरुणांचे शहराकडे स्थलांतर ही रोजची गोष्ट झाली होती. या कठीण परिस्थितीला ओळखून रोटरी क्लब ऑफ लातूर मिड-टाऊनने ठरवले "या शेतकऱ्यांसाठी काहीतरी कायमस्वरुपी करायला हवे." या विचारातून हराळीतील ज्ञानप्रबोधिनी संस्थेत Rotary Agro Equipment Bank ची स्थापना करण्यात आली. ३५,००० डॉलर किमतीच्या या ग्लोबल ग्रँटमधून आधुनिक शेतीसाठी आवश्यक औजारे व उपकरणे उपलब्ध करून देण्यात आली.शेतकऱ्यांना ती भाडेतत्त्वावर अत्यल्प दरात मिळतात. वापरानंतर ती परत जमा करून, आलेल्या भाड्यातून देखभाल केली जाते.यामुळे शेतकऱ्यांना प्रचंड दिलासा मिळाला आहे. पूर्वी जी साधने विकत घेणे त्यांच्यासाठी अशक्य होते, तीच साधने आज त्यांच्या हाताशी सहज उपलब्ध झाली आहेत.जानेवारी २०२४ मध्ये सुरु झालेल्या या प्रकल्पाने केवळ दीड वर्षात ३०० पेक्षा जास्त शेतकरी लाभार्थी यांना १००० एकरांहून अधिक क्षेत्रावर आधुनिक औजारांचा वापर झाला आहे. उत्पादनात लक्षणीय वाढ दिसून येत आहे. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती मधे सुधारणा होताना दिसत आहे. तसेच तरुण शेतकरी पुन्हा आत्मविश्वासाने शेतीकडे वळू लागले आहेत.आज हराळीतील "Rotary Agro Equipment Bank" हा एक प्रकल्प न राहता शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण बनला आहे. यामुळे "Service Above Self" या रोटरीच्या तत्त्वाची खरी प्रचीती आली आहे. ज्ञानप्रबोधिनी येथील श्री अभिजित कापरे, सौ गौरी कापरे, श्री सुरेश मरगळे हे अतिशय सचोटीने व शिस्तबद्ध पद्धतीने ही औजारे बँक चालवत हे स्वप्न पुरवत्यास नेत आहेत.या प्रकल्पामागे अनेकांचे मार्गदर्शन व प्रयत्न आहेत त्या वर्षीच्या प्रांतपाल रो. स्वाती हेरकळ यांचे भक्कम मार्गदर्शन, अमेरिकास्थित एनआरआय रो. संजय देशपांडे यांचे सततचे मार्गदर्शन व पाठपुरावा, अमेरिकास्थित एनआरआय डॉ. शुभांगी ठाकूर यांचे आर्थिक सहकार्य, अमेरिकेतील Rotary Club of Emmaus क्लबच्या DRFC Rtn.Cindy आणि आपले DRFC रो. सुहास वैद्य यांची मोलाची साथ.प्रायमरी कॉन्टॅक्ट रो. सुधीर लातुरे, त्यावेळचे सचिव रो. डॉ. अविनाश भोसले, रो. किशोर दाताळ, फाऊंडेशन डायरेक्टर रो. डॉ. किरण दंडे, कम्युनिटी डायरेक्टर रो. कलश मुंदडा, उपाध्यक्ष रो. अमोल दाडगे यांची अथक धडपड यामुळेच हे शक्य झाले आहे.सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यावेळी क्लबमधील तब्बल ६२ सदस्यांनी रोटरी फाऊंडेशन मार्फत आर्थिक योगदान देऊन हा प्रकल्प सामूहिकतेने उभा केला.रोटरी क्लब ऑफ लातूर मिड-टाऊनचा हा पहिला ग्लोबल ग्रँट केवळ शेतकऱ्यांचे आयुष्य बदलणारा ठरत नाहीय, तर संपूर्ण रोटरी परिवारासाठी प्रेरणा देणारा ठरत आहे.

**- रो. रविंद्र बनकर**

## रोटरी शेती औजारे बँक रोटरी क्लब ऑफ लातूर मिड-टाऊनचा **पहिल्या ग्लोबल ग्रँट ची यशोगाथा**



बैलपोळा हा शेतकऱ्यांचा बैलाप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा उत्सव असतो .तो श्रावण अमावस्या किंवा भाद्रपद अमावस्येला तिथीनुसार व प्रदेशानुसार साजरा करण्यात येणारा बैलाचा सण होय. विशेषता महाराष्ट्रातील विदर्भ ,मराठवाड्यात तसेच सीमावरती तेलंगणा, मध्यप्रदेश ,छत्तीसगड व कर्नाटक या राज्यातही वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो .विशेषतः कर्नाटकात व महाराष्ट्रातील कोल्हापूर व पश्चिम महाराष्ट्रात वटपौणिमेच्या दुसऱ्या दिवशी बेंदूर सण या नावाने तू साजरा केला जातो .वर्षभर बैल शेतीची मशागत करतात. त्यांच्या कष्टांमुळेच शेतकऱ्यांच्या घरात धनधान्य येते. शेती पिकते ,आणि तेच धान्य कुटुंबाला व सर्व मानव जातीला खायला त्यांच्याच कष्टांमुळे मिळते. बैल हा शेतकरी कुटुंबातील एक सदस्य असल्यासारखेच त्याची राखण व सेवा शेतकरी करतो. कृषी संस्कृतीच्या उगमापासूनच बैलाच्या मदतीने शेतीची मशागत करण्याचा शोध लागला. तेव्हापासून तो कुटुंबाचा आधार व सदस्य म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. तो शेतकऱ्याचा जीव की प्राण असतो .अशा सर्जा राजाच्या सण म्हणजे बैलपोळा . त्या काळात पीके जोमात असतात.शेतीतील कामे संपलेली असतात .मुबलक चारा सर्वत्र उगवलेला असतो. पाऊस चांगला झालेला असतो. नदी तलाव भरलेली असतात. त्यात त्याला धूऊन पोहणी घातले जाते .त्याला चांगल्या गवतात चारून, खुराक देऊन धष्टपुष्ट करून, स्वच्छ केले जाते. एक दिवस अगोदर त्याची खांदे जे जू ठेवून दुखावलेले असतात त्याला तेल लावून चोळून स्वच्छ केली जातात त्यालाच खांदे मळणी असे म्हटले जाते .या दिवशी त्याला गुळाची गुळवणी, तेल पाजले जाते .या काळात त्याला कुठलेही काम लावले जात नाही. गोंडे, मटाट्या,लोकरीची कंडे, म्होरक्या घालून ,शिंगे रंगवून पाठीवर झूल पांघरून ,गळ्यात घुंगर माळा, घाट्या घातले जाते.पोळ्यादिवशी त्याला संध्याकाळी गाव वेशीतून गावातील मानाच्या बैलाची वाजत गाजत मिरवणूक निघते. नंतर गावातील इतरांची बैल एकत्र ग्रामदैवत हनुमानाच्या मंदिराभोवती वाजत गाजत प्रदक्षिणा घालून घरी आणून त्याचे औक्षण केले जाते. गोड पोळी, नैवेद्य खाऊ घालून तुझ्या पायगुणाने घराला बरकत येऊ दे व असाच निरोगी राहून शेतीची मशागत करुदे अशी प्रार्थना केली जाते . शेतीत काम करणारे गडी ,कामगार यांना अगोदर गोडपोळीचे जेवण दिले जाते व नंतरच घरधनी जो दिवसभर बैलाचा उपवास धरला असतो तो उपवास सोडतो.काही भागात याच अमावस्येला पिठोरी अमावस्या ही म्हटले जाते .ज्यांचेकडे बैल नाहीत ते चिखलाचे बैल करून पुजतात. त्या दिवशी सकाळी शेतीतील सर्व अवजारे धुवून पुसून, त्याला गेरु ,चुना लावून घरी अंगणात मांडून पूजा करतात. बैलाचा गोठा स्वच्छ करून त्याला सारवून , रंग रंगोटी करून भिंतीवर शेती अवजारांचे चित्र काढतात .लहानमुले अंबाड्यापासुन वळलेली चाबुक वाजवतात. दारासमोर रांगोळी काढून घराला आंब्याच्या पानाची तोरणे लावली जातात,फुलाच्या माळा लावल्या जातात. घर ,गाव या दिवशी आनंदात डुंबून गेलेले असते .पण झाले काय? आजकाल यांत्रिकीकरणामुळे शेतीची कामे ट्रॅक्टर कर्वी केली जाऊ लागली .शेतीची तुकडे झाल्यामुळे लहान लहान क्षेत्रातील शेती असल्यामुळे शेतकऱ्यांना बैल पोसणे, त्याची निगा राखणे आणि वर्षभर बैल सांभाळणे होत नाही. त्यामुळे बैलाची संख्या सध्या घटली आहे .तरीही ग्रामीण भागात या सणाचा उत्सव कायम आहे.बाजार, दुकाने गोंडे, दोरखंड ,घुंगरमाळा झुली यानी सजलेली दिसतात. असा हा कृषी संस्कृतीचे जतन करणारा बैलपोळा सण ग्रामीण महाराष्ट्रात उत्साहात साजरा केला जातो आणि तो आनंद अवर्णनीय असतो.

**-रो.रमेश चिल्ले**

मुद्रक : क्रिएटीव आर्टस अँड ग्राफीक्स लातूर 9730887221

## Rotary Mid Town this Week Photo Gallery




## गणपती कार्यशाळा





गणपतीची कार्यशाळा:
काटगाव येथील वसंतराव नाईक शाळेत
गणपतीची कार्यशाळा संपन्न
डॉ. गिरीष कुलकर्णी यांचे मार्गदर्शन

## Membership Seminar Membrex 2025 - Akluj




## बैलपोळा २०२५ उत्सव






Evara Consultants

# Evara Consultants

From Vision to Reality One Step Solution



- Interior Design
- Renovation
- 3D Design
- Turnkey Projects
- Vastu Consultation
- Building Planning & Design
- Govt. Contractor
- Waterproofing work
- All types of Construction chemicals supply & Application work



Atharva A. Joshi 9689557543